दैनिक

# अतुल्य महाराष्ट्र

मुख्य कार्यालय : परळी वैजनाथ

बीड महाराष्ट्र | शनिवार, 23 मे 2026| | अंक क्र. 21| वर्ष 4 थे| मुल्य 3 रूपये | पृष्ठे 4

Website : atulymaharashtra.com RNI RGN No. MAH/MAR 2023/52446 Email : dailyatulyamaharashtra@gmail.com

''आपल्या माणसांसाठी आपल्या चवीचं हॉटेल''

हॉटेल बालाजी

ब्रम्हवाडी फाटा, बीड रोड, परळी वै.



# जिजामाता उद्यानाचा कायापालट होणार!

## उद्यानात नशाबाजी,अस्वच्छता आणि असुरक्षितेचे वाढले होते प्रमाण







## उद्यानातील सुरक्षा, स्वच्छता आणि सुशोभीकरणासाठी नगराध्यक्षांनी उचलले कडक पाऊल

## जिजामाता उद्यानाच्या सर्वांगीण विकासासाठी नगर परिषद कटिबद्ध – नगराध्यक्षा पद्मश्रीताई धर्माधिकारी

परळी वैजनाथ | प्रतिनिधी

शहराच्या मध्यवर्ती आणि ऐतिहासिक ओळख असलेल्या जिजामाता उद्यानाची आज नगराध्यक्षा सौ. पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी यांनी प्रत्यक्ष पाहणी करून विविध विकासकामांचा आढावा घेतला.

शहरातील नागरिकांच्या विरंगुळ्याचे केंद्र असलेले 'जिजामाता उद्यान' गेल्या काही काळापासून टुकार मुले आणि नशा करणाऱ्यांचा अड्डा तसेच अस्वच्छता या बाबी मोठ्या प्रमाणात वाढल्या होत्या. या गंभीर समस्येची दखल घेत परळी नगर परिषदेच्या नगराध्यक्षा सौ. पद्मश्री बाजीराव धर्माधिकारी यांनी पालिका पदाधिकाऱ्यांसह उद्यानाची प्रत्यक्ष पाहणी केली. या पाहणी दौऱ्यादरम्यान उद्यानाची दुरवस्था दूर करून त्याचा चेहरामोहरा बदलण्यासाठी नगराध्यक्षांनी नगर परिषद प्रशासनाला युद्धपातळीवर काम करण्याचे कडक निर्देश दिले आहेत.

या पाहणीदरम्यान नगराध्यक्षांनी संबंधित विभाग प्रमुखांना विविध महत्त्वपूर्ण सूचना दिल्या. उद्यानातील स्वच्छता आणि देखभाल अधिक प्रभावी करण्यासाठी कर्मचारी वेळापत्रक तयार करण्याचे निर्देश देण्यात आले. तसेच परिसरात ठिकठिकाणी डस्टबीन बसविणे, नाल्यांची नियमित साफसफाई करणे, बंद असलेला हायमास्ट तातडीने सुरू करणे, सोलार पथदिवे बसविणे आणि सीसीटीव्ही कॅमेरे उभारून सुरक्षा व्यवस्था मजबूत करण्याच्या सूचना देण्यात आल्या. उद्यान परिसरातील फूड प्लाझा व्यावसायिकांनी कचरा किंवा खरकटे उद्यानात टाकल्यास त्यांच्यावर दंडात्मक कारवाई केली जाईल, असा इशाराही नगराध्यक्षांनी दिला. याशिवाय मोदाणी यांच्या घराजवळ नवीन मजबूत गेट उभारणे, सूचना फलक बसविणे, वृक्ष व लॉन्ससाठी पाण्याची सक्षम व्यवस्था करणे, सार्वजनिक शौचालय उभारणे, आवश्यक ठिकाणी पेव्हर ब्लॉक बसविणे, नाली बांधकाम करणे तसेच काही भागांतील भिंतींची उंची वाढविणे या कामांनाही प्राधान्य देण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

### जिजामाता उद्यानात आधुनिक ग्रीन जिम तसेच लहान मुलांसाठी आकर्षक खेळणी बसविणार

**यावेळी राज्याचे माजी मंत्री तथा परळी विधानसभा मतदारसंघाचे आमदार धनंजय मुंडे आणि ना. पंकजाताई मुंडे यांच्या आमदार निधीतून जिजामाता उद्यानात आधुनिक ग्रीन जिम तसेच लहान मुलांसाठी आकर्षक खेळणी बसविण्यात येणार असल्याची माहितीही नगराध्यक्षांनी दिली.पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर उद्यानात नव्याने हिरवेगार लॉन विकसित करणे, रंगीबेरंगी फुलांचे ताटवे तयार करणे तसेच विविध वृक्षांची लागवड करण्याचे नियोजन करण्यात येत असल्याचेही त्यांनी सांगितले. उद्यान परिसर अधिक सुरक्षित राहावा यासाठी पोलिस बिट अंमलदारांकडून नियमित पेट्रोलिंग करण्यात येणार असल्याची माहितीही यावेळी देण्यात आली.**

**"जिजामाता उद्यान हे परळीच्या वैभवात भर घालणारे ठिकाण आहे. येथे येणाऱ्या महिला, लहान मुले आणि ज्येष्ठ नागरिकांना सुरक्षित व आल्हाददायक वातावरण मिळावे यासाठी नगर परिषद कटिबद्ध आहे. उद्यानाचे विद्रुपीकरण करणाऱ्यांवर कडक कारवाई केली जाईल."**

**— सौ. पद्मश्री बाजीराव धर्माधिकारी** (नगराध्यक्षा, परळी वैजनाथ)

जिजामाता उद्यान हे परळी शहराचे वैभव आहे. या उद्यानाचे संवर्धन, सौंदर्यीकरण आणि जतन करणे ही प्रत्येक नागरिकाची सामूहिक जबाबदारी आहे. नगर परिषद या कामात कुठेही कमी पडणार नाही असा विश्वास नगराध्यक्षा सौ. पद्मश्री धर्माधिकारी यांनी व्यक्त केला.

या पाहणीवेळी माजी नगराध्यक्ष बाजीराव भैय्या धर्माधिकारी, राष्ट्रवादीचे गटनेते वैजनाथ सोळंके, भाजप गटनेते व बांधकाम सभापती प्रा. पवन मुंडे, नगर अभियंता ज्ञानेश्वर ढवळे, कार्यालयीन अधीक्षक संतोष रोडे यांच्यासह विद्युत, स्वच्छता, बांधकाम आणि नळ जोडणी विभागातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# शेतकऱ्यांसाठी मोठा दिलासा!

## ३० जूनपर्यंत कर्जमाफी ; सिबिल स्कोअरचा अडसर हटणार

**मुंबई :** राज्यातील शेतकऱ्यांसाठी मोठा दिलासा देणारा निर्णय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जाहीर केला आहे. राज्य सरकारकडून ३० जूनपर्यंत शेतकरी कर्जमाफीची प्रक्रिया पूर्ण केली जाणार असून, पीककर्जासाठी अर्ज करताना सिबिल स्कोअरचा अडसर दूर करण्याचे स्पष्ट निर्देश बँकांना देण्यात आले आहेत.

मुख्यमंत्री फडणवीस यांनी बँकांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबत झालेल्या बैठकीत स्पष्ट केले की, शेतकऱ्यांच्या आर्थिक अडचणींचा विचार करून सिबिल स्कोअरच्या आधारावर पीककर्ज नाकारता येणार नाही. शेतकऱ्यांना

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची मोठी घोषणा पीककर्जासाठी शेतकऱ्यांना मिळणार मोठा दिलासा



वेळेत कर्ज उपलब्ध करून देण्यासाठी आवश्यक ती सर्व कार्यवाही तातडीने पूर्ण केली जाईल.

राज्य सरकारने खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर हा निर्णय घेतला असून, त्यामुळे लाखो शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे. अनेक शेतकरी सिबिल स्कोअरमुळे कर्जापासून वंचित राहत होते. आता हा अडसर दूर झाल्याने शेतकऱ्यांना सहज पीककर्ज मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. या निर्णयामुळे ग्रामीण भागात समाधान व्यक्त होत असून, शेतकरी वर्गाने सरकारच्या या निर्णयाचे स्वागत केले आहे याबाबत आणखीन नवीन माहिती आणखीन समोर येईलच.

# आयुष्यमान भारत योजनेद्वारे आष्टी,पाटोदा आणि शिरूर तालुक्यातील रुग्णांना जास्तीत जास्त लाभ : ओमप्रकाश शेटे

## 22 जुलै रोजी मुख्यमंत्र्यांच्या वाढदिवसानिमित्त महाआरोग्य शिबिराचे आयोजन : सुरेश धस

आष्टी (प्रतिनिधी)

आयुष्यमान भारत मिशन समिती महाराष्ट्र राज्य, प्रधानमंत्री जन आरोग्य योजना, महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना याद्वारे आष्टी पाटोदा आणि शिरूर तालुक्यातील जास्तीत जास्त रुग्णांना लाभ देण्यात येणार आहे आगामी काळात किमान 25000 रुग्णांना या योजनेचा फायदा होईल असे नियोजन करण्यात येणार आहे असे प्रतिपादन डॉ.ओमप्रकाश शेटे अध्यक्ष आयुष्मान भारत मिशन समिती महाराष्ट्र राज्य यांनी केले



आष्टी येथे आयोजित आयुष्मान भारत मिशन आढावा बैठकीमध्ये ते बोलत होते यावेळी आ.सुरेश धस यांनी दि.22 जुलै रोजी महाराष्ट्र राज्याचे लोकप्रिय मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने महाआरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात येणार असून या शिबिरामध्ये विविध प्रकारच्या रुग्णांवर तसेच वयोवृद्ध नागरिकांच्या गुडघेदुखी सारख्या व्याधींवर देखील उपचार करण्यात येणार आहेत असे प्रतिपादन केले आष्टी येथील आयुष्यमान भारत मिशन समिती महाराष्ट्र राज्य यांच्या आढावा बैठकीमध्ये ते बोलत होते पुढे बोलताना डॉ.ओमप्रकाश शेटे म्हणाले की,विस्तारित आयुष्यमान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना या

उर्वरित पान २ वर

# महाडीबीटी पोर्टलचे काम पूर्ण होताच 'मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजने'चे ऑनलाईन अर्ज सुरू

## पशुसंवर्धन आयुक्तांची माहिती

संतोष सानप | आष्टी

ग्रामीण भागातील अर्थव्यवस्थेला बळ देणारी आणि पशुपालन व्यवसायाला उद्योजकतेचे आधुनिक स्वरूप देणारी *'मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजना'* राज्यात लवकरच पूर्ण ताकदीने सुरू होत आहे. ही योजना अत्यंत पारदर्शक पद्धतीने राबवण्यासाठी पशुसंवर्धन विभाग कटिबद्ध असून, सध्या 'महाडीबीटी' पोर्टलवर अर्ज स्वीकारण्याची तांत्रिक प्रक्रिया विकसित करण्याचे काम युद्धपातळीवर सुरू आहे. हे काम पूर्ण होताच इच्छुक लाभार्थ्यांकडून ऑनलाईन पद्धतीने अर्ज मागविण्यात येतील, अशी माहिती पशुसंवर्धन आयुक्त डॉ. किरण पाटील (भा.प्र.से.) यांनी दिली आहे.

राज्यातील पशुसंवर्धन व्यवसायाला आधुनिकतेची जोड देणे आणि ग्रामीण भागात रोजगाराच्या शाश्वत संधी निर्माण करणे हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे. ही योजना ग्रामीण भागातील उद्योजकतेला मोठी चालना देणारी ठरेल, तसेच राज्याच्या आर्थिक विकासात भरीव योगदान देईल, असा विश्वास पशुसंवर्धन विभागाने व्यक्त केला आहे.

### लवकरच अधिकृत सूचना जाहीर होणार




**पोर्टलचे तांत्रिक काम अंतिम टप्प्यात असून ते पूर्ण होताच, योजना अधिकृतपणे सुरू झाल्याची आणि अर्ज भरण्याची तारीख पशुसंवर्धन विभागामार्फत जाहीर केली जाईल, असे आयुक्त डॉ. किरण पाटील यांनी स्पष्ट केले आहे. त्यामुळे पशुपालकांनी आणि गरजू तरुणांनी आवश्यक कागदपत्रांची तयारी ठेवून महाडीबीटी पोर्टलवर लक्ष ठेवावे, असे आवाहन करण्यात येत आहे.**

योजनेचे स्वरूप आणि मिळणारे फायदे लक्षात घेता, राज्यातील युवा वर्ग, शेतकरी आणि पशुपालकांमध्ये या योजनेबाबत प्रचंड उत्साह पाहायला मिळत आहे. या पार्श्वभूमीवर, योजनेची अंमलबजावणी वेळेवर, अचूक आणि पारदर्शक पद्धतीने व्हावी यासाठी पशुसंवर्धन विभागाने आतापासूनच सूक्ष्म नियोजन सुरू केले आहे.

लाभार्थ्यांना अर्ज करण्यासाठी कुठेही हेलपाटे मारावे लागू नयेत आणि घरातूनच सहज अर्ज करता यावा, यासाठी संपूर्ण प्रक्रिया ऑनलाईन ठेवली जाणार आहे. 'महाडीबीटी' पोर्टलच्या माध्यमातून ही सुविधा उपलब्ध करून दिली जाईल. या विशेष पोर्टलच्या निर्मितीची जबाबदारी 'महाआयटी'कडे सोपविण्यात आली आहे. महाआयटीची तांत्रिक टीम हे पोर्टल लवकरात लवकर कार्यान्वित करण्यासाठी वेगाने काम करत आहे.

# मान्यवरांच्या उपस्थितीत राज्यस्तरीय पद्मपाणी पुरस्काराने भागवत मसने सन्मानित

अंबाजोगाई | प्रतिनिधी

यशवंतराव चव्हाण नाट्यगृह बीड येथे नुकतेच अंबाजोगाईचे सुप्रसिद्ध साहित्यिक, वात्रटिकाकर, आदर्श शिक्षक भागवत मसने ह्यांना विविध मान्यवरांच्या उपस्थितीत राज्यस्तरीय पद्मपाणी पुरस्काराने गौरविण्यात आले. यावेळी भागवत मसने यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवरांना देखील गौरविण्यात आले. या सन्मान सोहळ्याच्या अध्यक्ष पदी पोलीस उपनिरीक्षक पल्लवी जाधव , प्रा दिलीप तरकसे, आदर्श सरपंच जगताप, पोलीस उपनिरीक्षक जाधवर हे उपस्थित होते.



या सन्मान सोहळ्याच्या प्रारंभी दीपप्रज्वलन करून महापुरुषांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा दिलीप तरकसे यांनी केले. आपल्या प्रास्ताविकात तरकसे यांनी या पुरस्काराविषयीची कारणमीमांसा विषद केली. आपला समाज आज विविध क्षेत्रात विविध नवंरत्नांनी भरलेलाआहे. या नवरत्नाना त्यांनी केलेल्या कामाची पावती देने किंवा त्याच्या पाठीवर शाबासकीची थाप देणे हे आपले कर्तव्य असल्याचे सांगितले. तर

आपल्या सत्काराला उत्तर देताना भागवत मसने यांनीही आमच्या कामाची दखल घेणारे व आमच्याही पाठीवर थाप देणारे कोणीतरी आहे याबद्दल आनंद व्यक्त केला. या पद्म पुरस्काराने आम्हाला पुन्हा काम करण्यासाठी प्रेरणा मिळते आहे अशी भावना व्यक्त केली.

भागवत मसने यांनी आजपर्यंत अनेक कविता, वात्रटिका, बडबड गीते, गीते, पथनाट्ये, यासोबतच एकांकिका लेखन यासोबतच विविध ठिकाणी स्नेहसंमेलन, राष्ट्रीय सेवा योजना, सांस्कृतिक कार्यक्रम, वादविवाद स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा यामध्ये परीक्षक म्हणून देखील मागील अनेक वर्षे ते काम करत आहेत. त्याच्या याच कार्याची व साहित्याची दखल घेऊन बीड येथे राज्यस्तरीय पद्मपाणी पुरस्काराने आदर्श शिक्षक, वात्रटिकाकार, तथा जेष्ठ साहित्यिक भागवत मसने यांना गौरविण्यात आले. त्याचा या पुरस्काराबद्दल मसने सरांचे सर्वस्तरातून अभिनंदन होत आहे.

## संपादकीय

# वेदनेचा हुंकार

अंधारल्या दिशांना दु:खाची सल सलीला घायाळ जखमांचे भय भयाला भयावह अनामिक चिंता चिंतेच्या जोडीला चितेची वाट वाटेशी दटावत वृत्तींचा घाट घाटावर ऐकवत नाही चित्कार देहाला सोसवत नाही वार अंगाखांद्यावर स्पर्शाचा भार ऐ माय मी मरते वारंवार.

लहान-मोठ्या मुली ते विधवा, परित्यक्ता, वयोवृद्ध महिलांवर वैमनस्यातून होणारे अन्याय, अत्याचार, घरंदाज विवाहितांचे संशयास्पद मृत्यू, आत्महत्या प्रकरण म्हणजे समस्त स्त्री वर्गाची शारीरिक, मानसिक चाळण करण्याचे दरमहा वाढीस लागलेले प्रकार. या छिन्नविछिन्न करणाऱ्या मरणासन्न अवस्थेतून जाणं यासारखी क्लेषकारक घटना नाही. आजची उद्विग्न परिस्थिती ही याचं उत्तम द्योतक आहे. ढासळलेली व्यवस्था, बंदिस्त चौकट, राजकारणातले कैक डावपेच, न्यायप्रतीक्षेच्या विलंबित सहयोगामुळे विदारक स्थिती निर्माण झाली आहे, जी स्त्री-पुरुष समानता निवाड्याच्या संदर्भात उलटी खेळी खेळते. आचार-विचारांच्या सदाचारी मूल्यांना पायदळी तुडवण्याचे प्रकार वारंवार घडतात. जेव्हा यंत्रणा चौकटी बाहेरचा न्याय देऊ शकत नाही, तेव्हा समाजाभिमुख मानसिक संतुलनाचा विषय मुख्य ठरतो. आजच्या घडीला मानसिक स्वास्थ्याकडे गांभीर्याने पाहण्याची, तिची मशागत करण्याची गरज आहे.

एकविसाव्या शतकात आपण स्त्री-पुरुष समानतेचे गोडवे गातो. ते गाताना आपण थकत नाही. स्त्री म्हणजे माता, भगिनी ते देवस्वरूप भवानी आई. नारायणी रूपात आपण तिची पूजा बांधतो. कवन रचतो, गुणगान गातो. पण एका मोहाच्या क्षणी अमानवी अजगरी पाशात तिला अडकवलं जातं. वाममार्गे गुंगीच्या औषधांचा उतारा दिला जातो. राक्षसी वृत्तीचे व्रण शरीरभर उमटताना गुप्तांगावर वार करत अश्लील व्हिडीओ समाजमाध्यमात पसरवण्याची धमकी दिली जाते. शेवटी बलात्कार करून, खून करून तिची विल्हेवाट लावली जाते. ओळख मिटवली जाते. हा बदल एका दिवसातला नसतो, तर पुलाखालून बरंच पाणी वाहून गेलेलं असतं तेव्हा तो जाणवू लागतो. शरमेने मान खाली घालायला लावणाऱ्या विटंबना भयंकर कृत्याच्या मालिका षंढ समाजात रुजत आहेत. समाजात जेव्हा काही वेगळं घडतं तेव्हा त्याची सुरुवात चार भिंतीतल्या कुटुंबाच्या आत होत असते. लैंगिक शोषण असो वा अनैतिकता, व्यभिचार वा विवाहबाह्य संबंध असो नराधमाला पाठीशी घालणारी घरची देखील यात सामील असू शकतात. यास्तव बाईकडे पाहण्याचा दृष्टिकोनहीन आणि समस्त स्त्रीवर्गाला अधाशी वासनांध नजरेतून पाहण्याची जणू मुभा प्राप्त झाली असावी असा झाला आहे. संशय निर्माण करणाऱ्या नात्यातली तेढ वाढत जाऊन अनैतिक संबंध, पुनर्विवाह, पती-पत्नी, प्रियकर-प्रेयसी त्रिकोण, कुणाचा पायपोस कुणाला नसल्याने कुणीही यावे टपली मारून जावे, बघू नये, बोलू नये, गुपचूप बसावे अशा प्रकारच्या कर्मकांडाला आपणचं खतपाणी घालत आहोत.

कुस्करली कोवळी काया दाह भरले भेदरले अंग देहाचे भग्न अवशेष मुग्धकलिका छिन्नविछिन्न दल नाजूक भावकळ्यांचे पाऊले चिमुकली सानुली कळी खुलण्याआधी परतली न मागे फिरली, परतली न मागे फिरली.

नसरापूर घटनेतील छोट्या चिमुकलीवर शब्दांत भावना व्यक्त करणं कठीण आहे. जो अत्याचार झाला त्याची जखम खोलवर आहे. आतून काही तुटल्यासारखं होताना वेदनेचा आवाज गपगार झाला आहे. आज पाशवी अत्याचार करणारे विकृत नराधम आणि उर्वरित व्यवस्था बाईचा आवाज दडपून टाकतील, पण उद्या हाच आवाज प्रतिरोधाच्या आगीत तुम्हाला भस्म करेल. आजची स्त्री सुरक्षित आहे का? हा प्रश्न अनुत्तरीतच आहे. सर्वांच्या नजरा त्याकडे लागून राहिल्या आहेत. माणूस माणसापासून दूर जात आहे. सहनशक्तीचा कडेलोट होतोय. प्रश्नमंजूषा पेटून उठली आहे. या सगळ्याला जबाबदार कोण? मानसिक विकृती की भाग्यशाली संस्कृती याची जाणीवपूर्वक विचार करून उत्तरं देण्याची वेळ आली आहे. फाशी देऊन, बंदुकीच्या गोळ्या घालून, रस्त्यात जमावाकडे सुपूर्द करून, कडेलोट, जन्मठेप देऊन नराधम माणूस मरेल, पण शिक्षा इतकी भयंकर हवी की ही नालायक 'वृत्तीचं' मरायला हवी. माजलेल्या भेकड वाकडतोंड्या नराधमाला आलेली हिम्मत मारायला हवी. याला फाशी देणं म्हणजे याची क्षणात सुटका करणे, असे न करता याच्याच मार्गावर असणाऱ्यांना हादरवून सोडणारा भयंकर मृत्यू याला द्यायला हवा. अखेर मृत्यू म्हणजे सुटका वाटायला हवी.

मर्यादा ओलांडणाऱ्या महिन्याभरातल्या घटना पाहता हे जग आपल्यासाठी नाही याची खात्री पटत चालली आहे. मानवी मनातली गुंतागुंत पाहता माणसं विरुद्ध वाढत चाललेल्या विकार विकृतीची नशा जोर धरू लागली आहे. अशा क्रूर निर्दयी मानसिकतेला बदलणं अशक्यप्राय गोष्ट आहे. कारण जगात माणूसपण संपत चाललंय तसा चांगुलपणा पानावरील मिठासारखा केवळ नावालाचं उरलाय. पुढच्या काळात बाईच्या जातीला काय काय वाढून ठेवलं असेल सांगता यायचं नाही. स्पर्श न कळण्याइतपत ती बधिर नाही पण अव्यक्त जळजळीत नजरेचा स्पर्श किती खोल रुततो हे तीच तिचं जाणो. लहानपणापासूनच्या अनेक स्पर्शात वासना, कित्येक चाळे कशावरून तिने अनुभवले नसतील? ही विचार करण्यासारखी गोष्ट आहे. जागोजागी अंगाखांद्यावर रुळलेले, रस्तोरस्ती, घरादारांत, शाळा, कॉलेजमध्ये अनामिक चाटून गेलेल्या कितीतरी स्पर्शांची कथा विचार करायला लावणारी आहे. यावर खबरदारीचा उपाय म्हणून स्वतःच्या आणि मुलीच्या सुरक्षिततेची उपाययोजना हवी. काळ सोकावला असता मुलींच्या जन्मामागे पुरुष वर्ग विचाराधीन होईल. काळजी करेल. आई-बापाच्या पोटी कन्या युक्त भीतीच्या भिंती उभ्या राहतील. हीच भीती मनात घेऊन मुली जन्म घेतील. बाप आणि आजोबा सोडला तर कुठेही कुणाबरोबर जाण्याची भीती कन्या बाळगतील. न्यायप्रवीष्ट व्यक्त होण्याचे सारे मार्ग बंद होतील. एव्हाना व्यक्ततेत बदल झाला असता, तर सगळं चित्र पालटलं असतं. पण असं होत नाही, उलट आवाज दडपवण्याच्या प्रयत्नात नराधम रातोरात सुटल्याचे आपण पाहतोय. त्यांचाच जय होतोय. अशा घटनेतून पृथ्वीचा विनाश काळ जवळ येण्याचे संकेत खऱ्या अर्थाने मिळू लागले आहेत. खून, मारामाऱ्या, दरोडे, लुटमार, बलात्कार, अब्रूचे धिंडवडे, व्यभिचार, भ्रष्टाचार या साऱ्यांनी डोकं वर काढलं आहे. अत्र तत्र सर्वत्र अराजकतेचं राज्य पसरलंय. मोर्चे, आंदोलन, नैसर्गिक हानी, जाळपोळ, आगीच्या घटना या सगळ्या हानिकारक गोष्टी मानवाला, चराचराला संपुष्टात आणतील. मरण दाराशी येऊन थांबलंय तसे आपण डोक्यावर जास्तीचा भार घेऊन जगतोय. यामध्ये 'विनाशकाले विपरीत बुद्धी'चा परिणाम भयंकर असेल. यात आपल्या कित्येक पिढ्या जळून खाक होतील. तेव्हा आता खरी गरज आहे शांततेची, मग्नतेची, स्वत:मध्ये डोकावण्याची. जग बदलायच्या प्रयत्नात आपण बिघडत चाललो आहोत. सुधारणा करून चांगलं वागण्याचा प्रयत्न तरी करून पाहूया. आत असलेला काळाकुट्ट अंधार नाहीसा करू या. मनातल्या जळमटीला तिलांजली वाहू या. अति रागलोभाचे निरसन करू या. हिंसक विचार प्रयत्नपूर्वक सोडू या. स्वतःपासून केलेली सुरुवात हीच खरी सुरुवात असेल. नांदी असेल. जोवर पृथ्वी आहे तोवर जग आहे. जगावेगळी सृष्टी स्थावर आहे. तेव्हा हे सुंदर जग सानुल्या चिमुकल्या जीवांसाठी विश्वासार्ह जगण्यालायक आणि आनंदी राहण्यायोग्य बनवण्याच्या प्रयत्नात माणूस म्हणून जगताना या साऱ्या गोष्टींचं भान ठेवू या.

**अमरावती येथे सिकची रिसॉर्ट मध्ये सुरु असलेल्या डॉ. पंजाबराव देशमुख आयएएस अकादमीच्या रौप्य महोत्सवी मिशन आयएएस संस्कार शिबिराला समारोपाला महाराष्ट्राचे अपर मुख्य सचिव श्री विकास खारगे आयएएस हे अपर मुख्य सचिव झाल्यानंतर अमरावतीला प्रथमच येत आहेत त्यानिमित्त**

# महाराष्ट्राचे नवे अपर मुख्य सचिव : श्री. विकास खारगे



**मागील महिन्यात मी माननीय श्री विकास खारगे यांना संदेश टाकला. आमचे रौप्य महोत्सवी स्पर्धा परीक्षा संस्कार शिबीर अमरावतीला आहे. यावर्षी संस्थेचा रौप्य महोत्सव आहे. या संस्थेचे उद्घाटन आपण पंचवीस वर्षांपूर्वी जिल्हाधिकारी असताना केले आहे. तरी आपण रौप्य महोत्सवाच्या समारोपाला यावे असे त्यात म्हटले होते. साहेबांचा लगेच फोन आला .त्यांनी  पूर्ण चौकशी केली आणि मी नक्की येतो असे आश्वासन दिले. मी रितसर निमंत्रण द्यायला मंत्रालयात त्यांच्या कक्षात गेलो. ते म्हणाले तुम्ही स्वतः येण्याची गरज नाही .तुम्ही तुमचे काम प्रामाणिकपणे करीत आहात. याची मला जाणीव आहे. मी तुमच्या रौप्य महोत्सवाला येणार आहे. त्याप्रमाणे साहेब दि. 22 मे रोजी अमरावतीला सकाळी दहा वाजता सिकची रिसॉर्ट मध्ये येत आहेत.**

शुक्रवार दि. २ ऑगस्ट २०२४ या तारखेची गोष्ट. रात्रीचे अकरा वाजले होते. मी झोपायला जाण्यापूर्वी मोबाईल पाहिला. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री मा. श्री. एकनाथ शिंदे यांचे प्रधान सचिव मा. श्री. विकास खारगे साहेब यांचा एसएमएस दिसला. खारगे साहेबांची अपर मुख्य सचिव म्हणून पदोन्नती झाली होती. श्री. विकास खारगे साहेबांची माझी पहिली भेट ते यवतमाळला जिल्हाधिकारी असताना झाली आणि ती अजुनही कायम आहे.

आमच्या डॉ. पंजाबराव देशमुख आयएएस अकादमीच्या कामाची सुरवातच १२ मे २००० रोजी अमरावतीला झाली. या कार्यक्रमाला मा. श्री. खारगे साहेब प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्याचबरोबर आयकर आयुक्त श्री. अभिनय कुंभार, आयआरएस, मनपा आयुक्त श्री. धनराज खामकर आयएएस हे देखील या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

खारगेसाहेब हे आमच्या अमरावती विभागातील यवतमाळला कलेक्टर होते. २००० साली हॉटेल, विश्राम भवन या गोष्टी फारशा प्रचलित नव्हत्या. खारगेसाहेबांचे जेवण माझ्याच घरी ठेवले होते. माझी पत्नी विद्या व तिच्या मैत्रिणी स्पर्धा परीक्षा कार्यशाळेला आलेल्या दोनशे मुलांचा स्वयंपाक करीत होत्या. खारगेसाहेबांना पटकन घरी जेवण करायला घेऊन आलो आणि मला आठवले की, आपण आपला डायनिंग टेबल कार्यक्रमाच्या ठिकाणी पाठवलेला आहे. जिल्हाधिकाऱ्यांना खाली बसून जेवण देणे मला प्रशस्त वाटेना. माझा चिंताग्रस्त चेहरा पाहून खारगेसाहेब म्हणाले. काठोळे काही अडचण आहे काय? मी नम्रपणे अडचण सांगितली. ते म्हणाले आपण खाली बसून जेवण करू. एक आयएएस अधिकारी, जिल्हाधिकारी खाली बसून जेवण करतो ही तशी दुर्मिळच गोष्ट आणि त्यामुळे ते कायमचे माझ्या लक्षात राहिले.

साहेब वेगवेगळ्या ठिकाणी गेले. पण सतत मी त्यांच्या व ते माझ्या संपर्कात आहेत. साहेबांचा फोन नंबर जरी बदलला तरी साहेब एसएमएस करून बदललेला नंबर कळवायचे. आज खारगेसाहेब एवढ्या मोठ्या पदावर आहेत. परंतु त्यांची साधी राहणी आणि उच्च विचारसरणी पूर्ण मंत्रालयाला आदर्शवत आहे. मी फारच महत्त्वाचे सार्वजनिक काम असले तरच साहेबांना एसएमएस किंवा फोन करतो आणि साहेबांचे वैशिष्ट्य असे की लगेच त्यांचा प्रतिसाद मिळतो. एका महत्त्वाच्या कामासाठी मी रात्री त्यांना १२ वाजून २२ मिनिटांनी एसएमएस केला. उद्या सकाळी आपल्याला प्रतिसाद मिळेल असे वाटले. परंतु लगेच बारा वाजून ३६ मिनिटांनी साहेबांचा प्रतिसाद आला.

तीच गोष्ट अमरावतीच्या श्री संत गाडगेबाबा स्मारक ट्रस्टची. मी गाडगे महाराज यांच्या मंदिरात गेलो. त्या ठिकाणी गाडगे महाराजांच्या समाधी मंदिराचा विकास आराखडा चार वर्षापासून मंत्रालयामध्ये पेंडिंग आहे असे मला व्यवस्थापकांनी सांगितले. मी लगेच श्री. विकास खारगेसाहेबांना फोन लावला. साहेबांनी फोन उचलला नाही. पण पाचच मिनिटात साहेबांचा फोन आला. मी साहेबांना वस्तुस्थिती सांगितली. साहेब म्हणाले ते फाईल रिवाईज करून माझ्याकडे पाठवा. मी लक्ष घालतो. महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांचे प्रधानसचिव जेव्हा स्वतःहून फोन करतात तेव्हा त्यांच्या ठिकाणी किती विनयशीलता असेल त्याचा प्रत्यय येतो.

मध्यंतरी आमच्या मिशन आयएएसच्या प्रेरणेने कोल्हापूरच्या उद्योजकता विकास केंद्राने करियर कट्टा हा उपक्रम सुरू केला. गुरुवर्य डॉ. ज्ञानेश मुळे IFS, यशवंत शितोळे हे त्याचे सूत्रधार. या कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यासाठी मान्यवरांना निमंत्रित करायचे होते. खारगेसाहेबांना निमंत्रित करण्याची जबाबदारी माझ्यावर होती. मी साहेबांना फोन केला. साहेब म्हणाले काठोळे त्यातारखेला मी उपलब्ध आहे. पण नेमके त्या दिवशी काय होईल ते सांगता येत नाही. कार्यक्रमाच्या एक दिवस आधी मुख्यमंत्र्यांच्या कार्यालयातून फोन आला. संबंधित अधिकारी म्हणाले खारगेसाहेबांना तुम्हाला बोलायचे आहे. साहेब फोनवर आले आणि मला म्हणाले उद्या भरपूर सभा आहेत. मला उद्याला कार्यक्रमामध्ये जॉईन होणे जमणार नाही. वेळेवर तुमची फजिती होऊ नये म्हणून मी तुम्हाला अगोदरच कळवले आहे. किती ही दक्षता! एवढ्या वरिष्ठ अधिकाऱ्याने माझ्यासारख्या सामान्य माणसाची एवढी मोठी दखल घ्यावी हे खरोखरच फार मोठी जमेची बाजू आहे.

'घार हिंडते आकाशी, लक्ष तिचे पिलापाशी' या म्हणीप्रमाणे साहेबांचे आपल्या इचलकरंजी या गावाकडे लक्ष आहे. परवाच ते आवर्जून ज्या शाळेत शिकले त्या शाळेमध्ये गेले. शिक्षकांना भेटले. सेवानिवृत्त झालेल्या शिक्षकाच्या घरी जाऊन आले. त्यांना किती किती धन्य वाटले असेल. आज तर मुलांना आई वडिलांना भेटायला वेळ नाही आणि बोलायला वेळ नाही, अशी परिस्थिती आहे. परंतु हा देव माणूस आपल्या गावाकडे वळून पाहतो. सुरेश भटांच्या ओळीमध्ये सांगायचे तर, 'ते लोक होते वेगळे घाईत जे गेले पुढे... मी मात्र मागे वळून पाहतो मागे कितीजण राहिले... मागे वळून पाहणारे व बुडत्याला काठीचा आधार देणारे खारगेसाहेब आज एक आदर्श आयएएस अधिकारी म्हणून मंत्रालयातच नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्रामध्ये परिचित आहेत.

वनखात्यात सचिव असताना त्यांनी केलेले कार्य इतिहासात नोंद करण्यासारखे आहे. हे सगळे करीत असताना त्यांनी आपला प्रामाणिकपणा साधेपणा कायमचा जपला आहे. साहेब जेव्हा जेव्हा अमरावतीला येतात तेव्हा तेव्हा आवर्जून मला फोन करतात किंवा निरोप देतात. मी उद्या अमरावतीला येणार आहे. उद्याची सभा संपल्यानंतर तुम्ही कार्यक्रमाच्या ठिकाणी या. आपण सोबत जेवण करू. मागे डॉ. पंजाबराव देशमुख प्रबोधिनीमध्ये वन विभागाचा कार्यक्रम होता. साहेबांचा व्यस्त दौरा होता. तरीपण साहेबांनी मला दुपारच्या जेवणाला निमंत्रित केले.

मला कधीकधी आश्चर्य वाटते मी प्राध्यापक माणूस. लेखक माणूस आणि साहेब उच्चपदस्थ आयएएस अधिकारी. पण साहेबांनी ही उच्च अति उच्च पदे मिळूनसुद्धा माणुसकी जपली आहे. अधिकाऱ्याची वस्त्रे केव्हाच काढून ठेवलेली आहेत. एक सामान्य माणूस म्हणून कसं मला जगता येईल यासाठी ते सतत सहजपणे राहतात. परवा मला मंत्रालयात जायचे होते. शालेय शिक्षण मंत्री प्रा. वर्षाताई गायकवाड यांनी माझे भरगच्च कार्यक्रम ठेवले होते. मी साहेबांना भेटण्याची वेळ मागितली. साहेबांनी दिली. मी व महाराष्ट्राचे माजी माहिती संचालक श्री. देवेंद्र भुजबळ साहेब मुख्यमंत्री कार्यालयात खारगे साहेबांना भेटायला गेलो. आम्ही वेळे आधीच पोहोचलो. साहेबांनी आमचे मनापासून स्वागत केले. साहेबांना मी काही पुस्तके सप्रेम भेट दिली. साहेबांबरोबर फोटो काढले. आम्ही कितीतरी दिवसानंतर भेटत होतो. परंतु आमच्यातला जो स्नेह होता तो आहेच व राहीलही.

कधी कधी मनाला असं वाटते की प्रत्येक आय.ए.एस. अधिकारी प्रत्येक आयपीएस अधिकारी प्रत्येक सनदी अधिकारी खऱ्या अर्थाने खारगे साहेबांसारखा वागला तर या महाराष्ट्राचं सोनं झाल्याशिवाय राहणार नाही. साधी राहणी आणि उच्च विचारसरणी या न्यायानं साहेब वागतात. आवर्जून खादीचे कपडे घालतात. २ ऑक्टोबर असो की ३० जानेवारी असो. साहेब आठवणीने खादी ग्रामोद्योगाच्या दुकानात जातात. सोबत वहिनीसाहेबांना घेऊन जातात. आणि त्या ठिकाणी खादीचे कपडे खरेदी करतात. आज जेव्हा जिकडे तिकडे हाय फायचा जमाना आहे. त्या हाय प्रोफाइलमध्ये वावरणारा हा माणूस स्वतः मात्र खादीच्या कपड्यांमध्ये साध्या कपड्यांमध्ये वावरतो ही खरंच नोंद करण्यासारखी गोष्ट आहे.

साहेबांच्या कार्याची ओळख प्रशासनातील आणि मंत्रिमंडळातील सर्वच लोकांना आहे आणि म्हणून जेव्हा उत्तराखंडमध्ये ढगफुटी झाली. पूर्ण जगात हाहाकार झाला. तेव्हा महाराष्ट्रातील जे पर्यटक उत्तराखंडमध्ये गेलेले आहेत त्यांना सुखरूप आणण्याची जबाबदारी शासनाने माननीय श्री. विकास खारगे यांच्यावर सोपवली आणि त्यांनी ती आपल्या कुशल प्रशासनाने यशस्वी करून दाखवली. त्यांच्या या अतुलनीय कामगिरीबद्दल त्यांचा सन्मान देखील करण्यात आला. कोविडच्या काळात आमचे मित्र प्रा. प्रविण विधळे यांनी कोविड दूर करण्यासाठी एक उपाय सुचवला. मी साहेबांच्या कानावर ही गोष्ट टाकली. साहेबांनी लगेच त्यावर पाऊल उचलले. आपल्या सहकाऱ्यांना सूचना केल्या आणि त्या सहकार्यांनी प्रा.प्रवीण विधळे  यांच्याशी संपर्क साधला पूर्ण प्रकल्प समजावून घेतला खरं म्हणजे कोविड च्या काळामध्ये मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव किती व्यस्त असतील  परंतु तरी देखील आपल्या अतिशय व्यस्त कार्यक्रमातून त्यांनी या चांगल्या गोष्टीसाठी स्वतःहून पुढाकार घेतला.खरं म्हणजे एवढ्या मोठ्या पदावर माणूस आपल्या व्यस्त कार्यक्रमामुळे इतरांकडे लक्ष देऊ शकत नाही पण खारगे साहेब त्याला अपवाद आहेत.  मागील चार फेब्रुवारीला साहेबांच्या व्यंकटेश नावाच्या मुलाचे लग्न झाले अगदी मोजक्या लोकांच्या उपस्थितीत. पण या लग्नाची पत्रिका पाठवायला ते मला विसरले नाहीत खरं म्हणजे मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव असलेला आयएएस अधिकारी किती व्यस्त असतो याची आम्हा सर्वांना जाणीव आहे परंतु खारगे साहेबांनी यावेळेस त्यातूनही वेळ काढून आपले वेगळेपण सिद्ध करून दाखविले आहे "जितने वाले कोई अलग काम नही करते वह हरकाम अलग ढंगसे करते है" या शिवखेडाच्या ओळी मला पदोपदी जाणवतात आणि एवढ्या मोठ्या पदावरील माणूस आपल्या डॉ. पंजाबराव देशमुख आयएएस अकादमीच्या मिशन आय ए एस या उपक्रमात आमच्या पाठीशी उभे आहेत व राहतील.अशा या विशाल हृदयाच्या सर्वसामान्य माणसाप्रमाणे राहणाऱ्या व माणुसकीला जपणाऱ्या हृदयशील व कर्तृत्वशील व्यक्तिमत्वाला मानाचा मुजरा.असे चांगले आयएएस अधिकारी महाराष्ट्राला सतत मिळत राहोत आणि साहेबांचा हा प्रवास उपरोक्त प्रगतीकडे जावो अशी अपेक्षा व्यक्त करतो.

आज खारगे साहेब आमच्या रौप्य महोत्सवाला येत आहे ही आमच्यासाठी आणि नव्याने आय ए एस होणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी बाब आहे एवढा मोठा उच्चपदस्थ अधिकारी अमरावतीला संस्कार शिबिराच्या समारोपाला येत आहे ही खरोखरच अमरावतीच्या इतिहासात लिहून ठेवण्यासारखी गोष्ट आहे.

**- प्रा. डॉ. नरेशचंद्र काठोळे**
**संचालक मिशन आय ए एस**
**अमरावती 9890967003**

-------------------

## पान १ वरुन

# आयुष्यमान भारत योजनेद्वारे आष्टी,पाटोदा आणि शिरूर तालुक्यातील रुग्णांना जास्तीत जास्त लाभ : ओमप्रकाश शेटे

बीड जिल्ह्यामध्ये 01एप्रिल 20 20 पासून लागू असून दिनांक 28 जुलै 20 ते 20 पासून पांढऱ्या रंगाच्या शिधापत्रिका शासकीय न्यू शासकीय कर्मचारी यासह सर्व शिधापत्रिका धारा कुटुंबांचा समावेश करण्यात आला आहे तसेच कोणत्याही प्रकारची शिधापत्रिका नसलेले कुटुंबे यांचा देखील या योजनेत समावेश करण्यात आला आहे सर्वात महत्त्वाचे म्हणजे 23 फेब्रुवारी 20 26 पासून सर्व अंगीकृत प्राथमिक आरोग्य केंद्र मध्ये ही योजना लागू करण्यात आली आहे या योजनेमध्ये उपचाराची खर्च मर्यादा पाच लक्ष रुपये असून प्रतिक कुटुंब पृथ्वी वर्ष तसेच मूत्रपिंड प्रत्यारोपणासाठी साडेचार लाख रुपये प्रति कुटुंब प्रति वर्ष अशी तरतूद करण्यात आली असून त्यासाठी उत्पन्नाची कोणतीही अट लागू नाही रुग्ण नोंदणी पासून ते उपचार पूर्ण होईपर्यंत संपूर्ण प्रक्रिया डिजिटल पारदर्शक आणि ऑनलाईन जलद उपचार मंजुरी प्रक्रिया करण्यात येणार आहे तसेच सर्वात महत्त्वाचे म्हणजे या योजनेअंतर्गत यापूर्वी 1356 व्याधींवरील रुग्णांना अर्थसहाय्य मंजूर होत असे त्यामध्ये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विशेषत्वाने प्रयत्न करून 2399 व्याधींचा समावेश या योजने मध्ये करण्यात आला आहे या योजनेअंतर्गत सहभागी रुग्णालयांची संख्या 1792 वरून 4537 एवढी वाढली असून आता ही सेवा प्राथमिक आरोग्य केंद्रातून देखील उपलब्ध करून देण्यात आली आहे ऋण नोंदणी पासून पूर्ण होईपर्यंत संपूर्ण प्रक्रिया पूर्ण डिजिटल पारदर्शक आणि ऑनलाईन असून रुग्ण नोंदणी ऑनलाईन बायोमेट्रिक प्रणाली द्वारे करण्यात येत आहे त्यामध्ये हृदय फुफ्फुस यकृत प्रत्यारोपणासारख्या आजारांसाठी आता 22.00 लाख रु.पर्यंत उपचार सहाय्य करण्यात येत असून 70 वर्षे पेक्षा जास्त वयाच्या ज्येष्ठ नागरिकांना अधिकचे 5.00 लक्ष रुपये विमा कवच मंजूर करण्यात आले आहे एक जुलै 20 24 पासून शासकीय 18 खाजगी 47 असे 65 रुग्णालय तसेच 62 प्राथमिक आरोग्य केंद्र या योजनेमध्ये अंगीकृत करण्यात आले आहेत आष्टी पाटोदा आणि शिरूर तालुक्यातील लाभार्थ्यांना लाभ मिळण्यासाठी आयुष्यमान कार्ड काढण्यासाठी शिधापत्रिकांची अडचण होत आहे त्यासाठी तीनही तहसीलदारांनी यामध्ये लक्ष घालून जास्तीत जास्त लाभार्थ्यांना आयुष्यमान कार्ड उपलब्ध व्हावेत यासाठी प्रयत्न करावेत अशा सूचना दिल्या आष्टी पाटोदा शिरूर कासार तालुक्यातील 25 हजार रुग्णांना या योजनेचा लाभ देण्यात यावा असे काम करण्याची आवश्यकता असलेली सांगत त्यांनी आष्टी तालुक्यातील मोठ्या प्रमाणावरील रुग्ण अहिल्यानगर येथील अनेक विविध रुग्णालयांमध्ये उपचार घेतात त्यामुळे अहिल्यानगर येथील आयुष्मान भारत मिशन अंतर्गत काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांनी या सर्व रुग्णांची काळजी घ्यावी त्यांना योजनेचा लाभ मिळण्यास अडचणी निर्माण होऊ नये यासाठी अहिल्यानगर येथे विशेष बैठक घेऊन खाजगी रुग्णालयातील प्रमुखांना त्याबाबत सूचना करण्यात येतील असे सांगत ज्यादा पैसे आकारणाऱ्या हॉस्पिटलला दंड आकारण्यात येईल बीड येथील काही रुग्णालयांना दहा लाख रुपयांचा दंड करण्यात आला असेही त्यांनी शेवटी सांगितले यावेळी आ.सुरेश धस यांनी आष्टी पाटोदा आणि शिरूर (कासार ) तालुक्यातील तहसीलदारांना आयुष्यमान भारत कार्ड काढण्यासाठी शिधापत्रिकांची किंवा प्रमाणपत्र देऊन जास्तीत जास्त लाभधारकांना या योजनेचा फायदा व्हावा यासाठी सर्व यंत्रणा सतर्क करावी असे सांगत जामखेड येथील काही रुग्णालयांमध्ये अवास्तव ज्यादा स्वरूपामध्ये शुल्क आकारण्यात येते त्याची चौकशी करण्यात यावी असे सांगत आगामी 22 जुलै रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा वाढदिवस असल्याने त्यानिमित्ताने आष्टी विधानसभा मतदारसंघात विविध ठिकाणी महा आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात येणार असून त्यामध्ये मुंबई येथील अनेक व्याधींवरील उपचार करण्यासाठी विशेषतज्ञ डॉक्टरांना प्राचारण करण्यात येणार असल्याचे सांगितले आयुष्मान भारत योजनेअंतर्गत लाभार्थ्यांना जास्तीत जास्त लाभ मिळावा यासाठी काही प्रमुख कार्यकर्त्यांना मुंबई येथे प्रशिक्षणासाठी पाठवण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले आष्टी तालुक्यातील गावांची संख्या आणि अपघात ग्रस्त रुग्णांची संख्या पाहता आष्टी येथे आणखी एक 108 रुग्णवाहिका उपलब्ध करून देण्यात येईल असेही आश्वासन त्यांनी शेवटी दिले..

या आढावा बैठकीसाठी अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉक्टर संजय कदम  अहिल्यानगर येथील जिल्हास्तरीय सदस्य अमित घाडगे महाराज तहसीलदार आष्टी श्रीमती वैशाली पाटील नगराध्यक्ष जिया बेग सरपंच परिषदेचे प्रदेशाध्यक्ष दत्ता काकडे आष्टी विधानसभा अध्यक्ष गणेश शिंदे माऊली जरांगे बद्रीनाथ जगताप, आयुष्यमान भारत योजना जिल्हा समन्वयक डॉक्टर गायकवाड तसेच डॉक्टर शिवशंकर वलांडे डॉक्टर वसीम शेख तालुका वैद्यकीय अधिकारी डॉक्टर राजेश तांदळे आष्टी ग्रामीण वैद्यकीय अधीक्षक डॉक्टर रामदास मोराळे पाटोदा गटविकास अधिकारी उद्धव सानप आष्टी गट विकास अधिकारी गोकुळ बागलाने हे उपस्थित होते.

दैनिक पत्रक प्रकाशक मालक संपादक श्री. नितीन सोपानराव ढाकणे मुद्रक विठ्ठल त्रिंबक साबळे मातोश्री ऑफसेट प्रिंटर्स, मोंढा, हैद्राबाद बँकेजवळ परळी वैजनाथ, जि. बीड पिन - 431515 येथे छापुन मुख्य कार्यालय दैनिक अतुल्य महाराष्ट्र, जलालपुर रोड परळी वै. ता. परळी वै.जि.बीड (महाराष्ट्र) पिन - 431515 येथे प्रकाशित केले आहे. संपादक नितीन सोपानराव ढाकणे, मो. 8446447777 (वाद : परळी न्यायलय अंतर्गत)

# महागावात शेतकऱ्यांचा ‘हाहाकार मोर्चा’ ; जिल्हा प्रशासनाविरोधात संतापाचा उद्रेक !

## जगदीशभाऊ नरवाडे यांनी प्रशासनाला धरले धारेवर; पालकमंत्री आणि जिल्हाधिकाऱ्यांचा गळ्यात पोस्टर अडकवून निषेध




महागाव | प्रतिनिधी

तालुक्यातील शेतकऱ्यांसह नागरिकांच्या प्रलंबित मागण्या आणि प्रशासनाच्या उदासीनतेविरोधात महागाव येथे शेतकऱ्यांचा आणि महिलांचा अभूतपूर्व संतापाचा उद्रेक पाहायला मिळाला. ‘जन आंदोलन आधार संघर्ष समिती’च्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या ‘हाहाकार मोर्चात’ संतप्त शेतकऱ्यांनी आणि महिलांनी जिल्हा प्रशासनाविरोधात जोरदार घोषणाबाजी करत संपूर्ण परिसर दणाणून सोडला होता.तळपत्या उन्हाची तमा न बाळगता हजारो नागरिक या मोर्चात सामील झाले होते.

पिक विमा,अवैध दारू विक्री,खतांचा काळाबाजार, पाणंद रस्ते,घरकुल योजना यांसह विविध समस्या घेऊन जन आंदोलन आधार संघर्ष समितीचे संस्थापक अध्यक्ष जगदीशभाऊ नरवाडे यांच्या नेतृत्वात शेतकरी,घरकुल लाभार्थी महिला यांनी हाहाकार मोर्चा काढत तहसील कार्यालयावर धडक दिली यावेळी नरवाडे यांनी आपल्या घणाघाती भाषणात जिल्हा प्रशासनावर सडकून टीका केली. "महागाव तालुक्यावर सतत अन्याय केला जात असून प्रशासन कुंभकर्णी झोपेत आहे," असा थेट आरोप त्यांनी केला.

यावेळी आंदोलनकर्त्यांनी पालकमंत्री आणि जिल्हाधिकारी यांच्या निषेधाचे फलक गळ्यात अडकवून प्रशासनाचा तीव्र निषेध केला. तप्त उन्हातही महिला भगिनींचा वाढता सहभाग या मोर्चाचे मुख्य वैशिष्ट्य ठरले.

यावेळी तालुक्यातील सर्व शेतकऱ्यांना तातडीने आणि सरसकट पीक विमा मंजूर करण्यात यावा, बाजारात मिळणारे बोगस खत, बियाणे आणि औषधांची कृषी विभागामार्फत उच्चस्तरीय चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई व्हावी,

'लाडकी बहीण' योजनेचा मोबदला महिलांना तत्काळ आणि विनाअडथळा मिळाला पाहिजे, तालुक्यात 'गाव तिथे दारूबंदी' लागू करा, घरकुल योजनांचे प्रश्न सोडवा, पांदण रस्ते तात्काळ तयार करा आणि कलगाव येथील स्मशानभूमीसाठी तातडीने रस्ता उपलब्ध करून द्या.या मागण्या प्रशासनाकडे करण्यात आल्या होत्या.यावेळी तहसीलदार गजानन पराते, गटविकास अधिकारी दत्तात्रय कदम,पोलीस उपनिरीक्षक अमोल राठोड, तालुका कृषी अधिकारी अंकुश टकले यांनी आपापल्या विभागाची निवेदने स्वीकारली.

यावेळी या हाहाकार मोर्चात तालुक्यातील अनेक प्रमुख नेते आणि समाजसेवक खांद्याला खांदा लावून उतरले होते. यामध्ये जगदीश नरवाडे, नागोराव पाटील कदम, गोविंदराव देशमुख, संजय गरुड, मंगेश पाटील वानखेडे, स्वप्रिल नरवाडे, आकाश चव्हाण अमोल चंदापुरे, अमोल वानखेडे, ओम कुसुंगवार, बापूराव देशमुख, दिलीप सुरोशे, केदार जोशी, दादाराव ठाकरे दिगंबर गाडबैले यांच्यासह , सुवर्णा देशमुख, देवकाबाई राठोड मेहजबिन पठाण यांच्यासह विविध गावांतील नागरिक, शेतकरी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

मागण्या मान्य न झाल्यास आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशारा जाहीर सभेतून देण्यात आला असून, या 'हाहाकार मोर्चा'ने प्रशासनाचे धाबे दणाणले आहेत.

# गोवा आता बदलतो आहे...

### कॅसिनोचे वाढले सागर किनाऱ्यांपेक्षा अधिक महत्व


### शांत निसर्गसंपन्न पर्यटनस्थळापासून व्यावसायिक पर्यटनाच्या विळख्यात?

### अतिशय पुरातन मंदिरे, चर्च हे परिसरही आता गर्दी आणि गोगाटानी वेढले गेले आहेत.









शांत आणि मनाला भावनारा, प्रफुल्लित करणारा गोवा आता झपाट्याने बदलतो आहे. मनाला भुरळ घालणारे सागर किनारे, आकाशाच्या दिशेने झेपावले ली माडाची बन, सर्वदूर दिसणारी अन ऐकू येणारी सागराची खळखळ, फेसाळलेला किनारा मृदू मुलायम रेतीचे किनारे, आता कमी होत आहेत. एकेकाळी गोवा म्हटले की डोळ्यासमोर उभे राहायचे ते निळाशार समुद्र, स्वच्छ वाळूचे किनारे, नारळांच्या बागा, शांत गावे आणि निसर्गाशी एकरूप झालेले पर्यटन. देश-विदेशातील पर्यटकांना आकर्षित करणारे गोव्याचे वैशिष्ट्य म्हणजे त्याची नैसर्गिक संपन्नता आणि सांस्कृतिक जपणूक. मात्र गेल्या दोन दशकांत गोव्याच्या पर्यटन क्षेत्रात झालेल्या झपाट्याने व्यावसायिकीकरणामुळे या राज्याचे मूळ स्वरूप धोक्यात आल्याची भावना अनेक पर्यटक,पर्यावरणप्रेमी आणि स्थानिक नागरिक व्यक्त करत आहेत.

□मांडवी नदीपात्रांमध्ये उभारले गेलेले कॅसिनो, किनारपट्ट्यांवरील अनियंत्रित बांधकामे, पर्यटन व्यवसायाच्या नावाखाली वाढलेला पर्यावरणीय ताण, प्रचंड प्रमाणात होत असलेलं शहरीकरण आणि नैसर्गिक संसाधनांचा अतिवापर यामुळे गोव्याचे निसर्गसौंदर्य हळूहळू कमी होत असल्याचे दिसून येते. पर्यटनातून महसूल वाढविण्याच्या प्रयत्नात पर्यावरण संवर्धनाला दुय्यम स्थान देत कॅसिनो जुगार याच्याच मोठमोठ्या जाहिराती गोवा राज्याबाहेर देत जुगार खेळण्यास निमंत्रण देण्याची प्रथा ही मध्यंतरी दिसून आली.

गोव्यात नुकतेच 'डेल्टिन' (Deltin) कंपनीचे ११२ मीटर लांबीचे आणि सुमारे २,००० प्रवासी क्षमता असलेले महाकाय कॅसिनो जहाज दाखल झाले आहे. हे जहाज सध्या मुरगाव बंदर येथे नांगरण्यात आले आहे आणि स्थानिकांच्या विरोधांमुळे ते मांडवी नदीत उतरवण्यात कायदेशीर अडचणी निर्माण झाल्या आहेत. हे जहाज 'एमव्ही रॉयल फ्लोटेल' (MV Royale Floatel) या जुन्या जहाजाची जागा घेण्यासाठी आले असल्याचे कंपनीचे म्हणणे आहे मात्र, जुन्या जहाजाची क्षमता केवळ ७० प्रवाशांची होती, तर नवीन जहाजाची क्षमता २००० प्रवाशांपेक्षा जास्त आहे.

□शहरीकरण आणि प्रदूषण यातून बाहेर पडत वर्षातून एकदा का होईना मनाला विसावा मिळावा या साठी बरीच तरुण मंडळी गोव्यातील निसर्गाचा आंनद लुटण्यासाठी गोव्याला जातं असत.

नोकरी आणि कामातून वेळ मिळत न्हाई म्हणून तर निवृत्ती नंतर हिला घेऊन दोन दिवस गोव्यातील आनंद लुटू. दुपारच्या जेवणात पापलेट, कोळंबी चा बेत करू असे ठरवणाऱ्या निवृत्तीनंतर च्या व्यक्ती ना गोव्यात शहरातील वाहतुकीची कोंडीला आणि प्रदूषणाला समोर जावं लागतं आहे.

मोठ मोठीं बांधकामे, प्रचंड मोठे रस्ते, अवजड वाहने, त्याचा कर्ण कर्कश्श गोगाटात भुरळ घालणारी सागर किनारे हरवत चालली आहेत. हिरवीगार जंगलं, खाण प्रकल्पाने संपुष्टात येत आहेत. येणाऱ्या वाहनांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढल्यानं छोटी नागमोडी वळणा वळणाची गर्द वनराईत हरवलेली रस्ते आता अगदी उघडी पडली आहेत. सिंगल रोड ची जागा आता फोर लाईन ,सिक्स लाईन च्या महामार्गाच्या स्वरूपात रूपांतरीत झाली आहे.नवयुवक, युवतींना,नवविवाहित, निवृत्तीसहित सर्व प्रकारच्या वयातील मनाला मोहवणार गोवा, अन रुपेरी वाळूचे किनारे आता गुदमरून जात आहेत. नारळ,सुपारी, काजू, मासे, झिंगे अन मसाल्याचा वास आता मागे पडतो आहे. देशी विदेशी वाईन, बिअरचे कॅन, रिकाम्या बाटल्या, अन सिगारेटचा धूर सर्व 'बीच' वर दरवळतो आहे.बेकायदेशीर काम, अवैद्य व्यवसाय, स्पा-पार्लर, मसाज पार्लर, यांची संख्या मोठ्या प्रमाणात फोफावत आहे.

पूर्वी गोव्याची स्काय लाईन क्षितिज रेषा म्हणजे माडाची झाड दूरवर पसरलेला अथांग सागर किनारा असायची. आता टोले जंग टॉवर्स, नदी आणि खाडीवर भव्य पूलांची बांधकाम, धडकी हरवणारी त्याची पिलर्स, सहा पदरी रस्ते, प्रचंड ट्रॅफिक, चेंज- बदल निसर्गाच्या नियमाचा एक मुख्य भाग आहे. परंतु आम्हीं गोव्यातील अख्या निसर्गाला बदलतोय अस नाही का वाटतं ?

गोव्यातील अनेक प्रसिद्ध समुद्रकिनारे आजही पर्यटकांनी गजबजलेले असले तरी काही ठिकाणी मद्यपान, ध्वनीप्रदूषण, अस्वच्छता आणि बेजबाबदार वर्तन यामुळे त्यांची प्रतिमा मलिन होत आहे. कौटुंबिक पर्यटनासाठी ओळखल्या जाणाऱ्या काही किनाऱ्यांवर आता रात्री उशिरापर्यंत चालणारे अनियंत्रित कार्यक्रम आणि असामाजिक प्रकार वाढल्याच्या तक्रारी स्थानिकांकडून होत असतात. यामुळे गोव्याच्या पारंपरिक संस्कृतीवर आणि सामाजिक वातावरणावरही परिणाम होत आहे.

पर्यावरणीय ऱ्हासाचा प्रश्न अधिक गंभीर आहे. किनारी भागातील जैवविविधता, खारफुटी वनस्पती, समुद्री परिसंस्था आणि जलस्रोत यांच्यावर पर्यटनाचा वाढता दबाव जाणवत आहे. प्लास्टिक कचरा, सांडपाणी व्यवस्थेतील त्रुटी आणि वाढती वाहतूक यामुळे प्रदूषणाची समस्या निर्माण झाली आहे. गोव्याची ओळख असलेल्या शांत आणि हिरव्यागार परिसरावर काँक्रीटचे जंगल हळूहळू विस्तारत असल्याचे चित्र दिसते.

गोवा प्रशासनाने पर्यटन विकास आणि पर्यावरण संरक्षण यामध्ये संतुलन राखण्याची गरज आहे. कॅसिनो आणि इतर व्यावसायिक उपक्रमांवर प्रभावी नियंत्रण, किनारपट्टी संवर्धनासाठी कठोर धोरणे, स्वच्छता मोहिमांची काटेकोर अंमलबजावणी आणि पर्यावरणपूरक पर्यटनाला प्रोत्साहन देणे आवश्यक आहे. तसेच स्थानिक नागरिक, पर्यावरण तज्ज्ञ आणि पर्यटन क्षेत्रातील घटक यांना विश्वासात घेऊन दीर्घकालीन धोरण आखणे काळाची गरज आहे. गोवा हा केवळ पर्यटनाचा व्यवसाय नाही तर भारताच्या नैसर्गिक आणि सांस्कृतिक वारशाचा महत्त्वाचा भाग आहे. आर्थिक विकासाच्या नावाखाली त्याचे मूळ सौंदर्य आणि पर्यावरणीय समतोल गमावला गेला तर भविष्यात पर्यटनालाच मोठा फटका बसू शकतो. त्यामुळे गोव्याचे निसर्गवैभव, स्वच्छ समुद्रकिनारे आणि सांस्कृतिक ओळख जपण्यासाठी आजच ठोस पावले उचलणे आवश्यक आहे. निसर्ग पर्यटन समुद्रकिनारे हे मागे पडून आता गोवा जुगारी खेळाचे राज्य म्हणून नावलौकिकास येत असल्याने कौटुंबिक सहलींच्या आयोजनावर ही मर्यादा आल्याचे या क्षेत्रातील मंडळी बोलत आहेत. विकास आणि संवर्धन यांचा समतोल साधलाच तरच पुढील पिढ्यांनाही "सुंदर गोवा" अनुभवता येईल.

तुम्हाला काय वाटतं ?

**शब्दांकन –धनंजय आरबुने**

# लोकरंग

## साप्ताहिक संवाद : रुपयाची पडझड आणि बाजारामध्ये किंचित सुधारणा



आखाती देशातील मागील दोन महिन्यापासून अमेरिका आणि इराण सारख्या देशामध्ये भडकलेल्या युद्धाचे परिणाम संपूर्ण जगाला भोगावे लागत आहेत. जगभरातील अनेक देश इंधनाच्या बाबतीत आखाती देशांवर अवलंबून असल्यामुळे जगभरात इंधनाचा तुडवडा भासू लागला आहे. त्याचवेळी भारतीय रुपयाचे ऐतिहासिक अवमूल्यन होतेय आणि त्यातूनच शेअर बाजार सातत्याने कोसळतो आहे. सध्याची इंधन तुडवड्याची गंभीर समस्या,रुपयाचे अवमूल्यन आणि शेअर बाजाराची दोलायमान अवस्था याच अनुषंगाने अर्थतज्ज्ञ आणि शेअर बाजारचे अभ्यासक शशांक गुलगुले यांच्याशी आजचा सापथिक संवाद.

### १] आखाती युद्धाचा परिणाम म्हणजेच इंधनाची झालेली भरमसाठ दरवाढ आहे का?

होय आखाती देशात मागील दोन महिन्यापासून सुरु असलेल्या इराण आणि अमेरिका या देशांमध्ये सुरु असलेल्या युद्धाचा सर्वात मोठा दुष्परिणाम म्हणजे इंधनामध्ये दरवाढ होत आहे. काही देशामध्ये अगदी आपल्या भारतात देखील पेट्रोल,डिझेल आणि सी एन जी सारख्या इंधनाचा तुटवडा भासू लागलेला आहे. मात्र जगातील इतर देशांच्या तुलनेत आपल्याकडील इंधनाची भाववाढ हि कमी आहे. इतर देशामध्ये क्रूड ऑइल ची वाढ हि २५ ते २८ टक्के इतकी भरमसाठ आहे मात्र त्या तुलनेत आपल्या देशात हि वाढ २० टक्क्यापर्यंतच केलेली आहे.

### २]भारतीय रुपयाने मागील काही दिवसात अगदी तळ गाठलेला आहे याचे कारण?

भारतीय रुपया गुरुवारी १३ पैशानी कमी होऊन नव्या नीचांकी अंकावर पोहचला. यामुळे एका अमेरिकी डॉलरची किंमत ९७ रुपयांपर्यंत जाऊन पोहचलेली आहे. पश्चिम आशियायी संकटामुळे जगातिक कच्चा खनिज तेलाचा दर भडकला आणि त्याचा थेट परिणाम रुपयाच्या वाटचालीवर झालेला दिसतो. एकेकाळी आशियातील अधिक स्थिर चलनापैकी एक मानला जाणारा रुपया आता यावर्षी सर्वात खराब कामगिरी करणाऱ्या उदयोन्मुख बाजारपेठेतील चलनापैकी एक बनला आहे.

### ३] सध्याची शेअर बाजाराची स्थिती नेमकी कशी आहे?

रिलायन्स इंडस्ट्रीजच्या समभागांची मोठ्या प्रमाणावर खरेदी झाल्याने मागील काही दिवसापासून सातत्याने कोसळणारा भारतीय शेअर बाजार काही अंशाने का होईन वधारला आहे. यामुळे सेन्सेक्स आणि निफ्टी मध्ये किंचित वाढ झालेली आहे. कच्च खनिज तेलाचा दर वाढल्यामुळे बाजार सावध झाला असून बीएसई आणि एन एस इ चे सेन्सेक्स काही प्रमाणात वधारले. सेन्सेक्स मध्ये ११७ टक्के तर निफ्टी ४१ अंशांनी वधारला. मात्र पुढील काळात शेअर बाजाराची अवस्था हि डोलायमंच असणार आहे.

## चला पर्यटनाला : प्रेक्षणीय महाबळेश्वर

महाबळेश्वर हे महाराष्ट्रातील थंड हवेचे ठिकाण आहे. तसेच महाबळेश्वर हे सह्याद्रीच्या पर्वत रांगांवर समुद्र सपाटीपासून सुमारे ४५०० फुट उंचीवर वसलेले आहे.महाबळेश्वरला जुन्या मुंबई प्रांताची उन्हाळ्यातील राजधानी म्हणूनच संबोधले जात होते. येथील हिरवा निसर्ग, सुंदर बगीचे, उदयाने, श्वास रोखायला लावणारी दृश्ये इत्यादीमुळे पर्यटक मंत्रमुग्ध होतात. ब्रिटीश-कालीन वैभवसंपन्न आणि मनमोहक वाडे, इमारती या आजही त्यावेळच्या ब्रिटीश राजवटीची ओळख करून देतात. मार्च ते जून हा कालावधी महाबळेश्वरला भेट देण्यास योग्य आहे. येथील प्रेक्षणीय ठिकाणांना ‘पॉईंट’ म्हणतात. बहुतांशी ‘पॉईंट’ हे डोंगराच्या टोकालाच आहेत.

महाबळेश्वरातील सर्वात प्रसिद्ध पॉईंट म्हणून ओळखला जातो. या पॉईंटच्या डावीकडे खोल दरीतून कोंकणात जाणारीसावित्री नदी आहे तर उजवीकडे घनदाट जंगले आहेत यालाच ब्रम्हारण्य असेही म्हणतात हि सर्व मनमोहक आणि आकर्षक दृश्ये इतर गोष्टींचा विसर पडायला भाग पाडतात. हवामान जर स्वच्छ असेल तर या पॉईंटवरून रायगड किल्ला ,तोरणा किल्ला स्पष्ट दिसतात. याच मार्गावर ‘टायगर स्प्रिंग’, ‘इको पॉईंट’, ‘एलफिस्टन पॉईंट’ आहेत.

आर्थर पॉईंटच्या मार्गावरच मनमोहक ,आरोग्यदायक आणि नैसर्गिक दृष्टया समृद्ध असा ईको पॉईंट आहे.इथे खोल दऱ्या, उंच पर्वत पहावयास मिळतात.येथून खोल दरीमधल्या कोयना नदीचे दर्शन होते.तसेच या ठिकाणाहून मावळत्या सूर्याचे दर्शन त्याच्या सौंदर्यात आणखीनच भर टाकते.हा महाबळेश्वर मधील सर्वात प्रसिद्ध पॉईंटआहे.सर्व पर्यटक इथे मावळत्या सूर्याचे दर्शन घेण्याकरिता येत असतात.यालाच ‘सनसेट’ पॉईंट असेही संबोधतात.

## अक्षररंग : वाचनीय आणि स्फोटक -: वाळूचे किल्ले

"वाळूचे किल्ले" ही अविनाश कोल्हे यांची कादंबरी डिंपल पब्लिकेशनने देखण्या रूपात प्रकाशित केली आहे. ही कादंबरी अविनाश कोल्हे यांनी श्रीभाऊंच्या स्मृतीस अर्पण केली आहे. या निमित्ताने त्यांनी 'माणूस' चे दिवस, या शीर्षकान्वये आपल्या सविस्तर आठवणी मांडल्या आहेत. सप्टेंबर,१९८० मध्ये अविनाश पुणे सोडून मुंबईकर झाले. तरीदेखील त्यांचे पुण्याला प्रा.स.शि.भावे सरांना भेटण्यासाठी जाणे-येणे सुरू होते. त्यांच्याशी बोलताना श्री. ग. माजगावकर यांच्यासंबंधी बोलणे होत असे. १९८५ मध्ये 'माणूस'च्या रौप्य महोत्सवी वर्षी पुण्यात झालेल्या कार्यक्रमात श्रीभाऊ यांनी निवृत्त होण्याविषयी मनोगत मांडले होते. भावे सरांनी ' माणूस ' ची जबाबदारी घेण्याविषयी अविनाश यांना विचारले. त्यानंतर जानेवारी १९८७ पासून 'माणूस' त्रैमासिक स्वरूपात प्रकाशित करण्याचे ठरले. दरवर्षी दिवाळी अंकासह चार विशेषांक, अविनाश यांनी १९९१ पर्यंत संपादित केले. त्यावेळचे विविध अनुभव अविनाश यांनी सविस्तरपणे नोंदविले आहेत. या कादंबरीचे देखणे, रंगीत मुखपृष्ठ सतीश भावसार यांचे आहे. ही कादंबरी लहानमोठ्या आठ प्रकरणांतून वाचकांसमोर उलगडते.

रागिणी ठाकरे-पाटीलने बॉम्बे लॉ कॉलेजमध्ये, बी. ए. पूर्ण केल्यावर, पहिल्या वर्षाला प्रवेश घेतलाआहे. अभ्यासू रागिणी न्या. गजेंद्रगडकर वक्तृत्व स्पर्धेमध्ये सहभागी होण्यासाठी, मार्गदर्शनासाठी ज्येष्ठ ग्रंथपाल संतोष म्हात्रे यांना भेटते. हुषार रागिणी काय वाचते आहे, याची ते सखोल चौकशी करतात. इंग्रजी ग्रंथांचे वाचन करण्यास मार्गदर्शन करतात. नंतर कॅन्टीनमध्ये म्हात्रे तिची ओळख काही विशेष, मार्गदर्शक प्राध्यापकांशी वेळोवेळी करून देतात. संतोष म्हात्रे यांनीही कायद्याची पदवी घेतली आहे. संतोष म्हात्रे रागिणीचे ज्येष्ठ मित्र आणि मार्गदर्शक होतात. त्यांच्या तिच्याकडून खूप काही अपेक्षा आहेत.या कादंबरीतून वाचकांसमोर येणाऱ्या घडामोडी प्रामुख्याने पाच वर्षांतील आहेत (२०१३पर्यंत). मुंबईतील इंग्रजी-मराठी संमिश्र भाषा, वाढत्या वयाच्या युवा पिढीच्या लैंगिक प्रेरणा, त्याविषयीचे त्यांचे अनेक गैरसमज आणि अज्ञान हे सारे सुजाण वाचकांना जाणवते.

**संकलन –संयोजन : सुबोध रणशेवरे**

---

दैनिक
# अतुल्य महाराष्ट्र
Last page
बीड, शनिवार, 23 मे 2026

# परळी शहरात खळबळ!

# पैशासाठी हॉटेल चालकावर चाकूचे सपासप वार; दोन आरोपी अटकेत

## घटनेनंतर मुख्य आरोपी फरार झाला होता; पोलिसांनी कसून शोधमोहीम राबवत अखेर मुख्य आरोपीस सायंकाळी ताब्यात घेतले

**परळी वैजनाथ |प्रतिनिधी**

परळी येथील धरणीकर रोडवरील बलभीम गीते यांच्या घरासमोरील मोकळ्या जागेत पैशाच्या कारणावरून झालेल्या वादातून एका हॉटेल चालकाची चाकूने गळ्यावर व हातावर वार करून निर्घृण हत्या करण्यात आल्याची खळबळजनक घटना घडली आहे. या प्रकरणी परळी शहर पोलीस ठाण्यात दोन आरोपींविरुद्ध खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

कारभारी नारायण आंधळे (रा. नंदागोळ, ता. परळी, जि. बीड) असे मृत हॉटेल चालकाचे नाव आहे. ते परळी येथे 'पवण हॉटेल' चालवून आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करत होते.

मिळालेल्या माहितीनुसार, २१ मे २०२६ रोजी नेहमीप्रमाणे कारभारी आंधळे हे परळी येथील आपल्या हॉटेलवर होते. रात्री उशिरापर्यंत ते घरी न परतल्यामुळे त्यांचा मोठा मुलगा ओमकेश याने रात्री १२:२८ वाजता त्यांच्या मोबाईलवर संपर्क साधला. तेव्हा, मी सचिन राठोड याच्यासोबत आईस्क्रीम खात असून लवकरच घरी येतो, असे कारभारी आंधळे यांनी मुलाला सांगितले.

मात्र त्यानंतर काही वेळातच म्हणजेच रात्री १२:५३ वाजता संशयित आरोपी सचिन राठोड याने कारभारी यांच्या लहान मुलाला फोन करून, तुमच्या वडिलांवर वार झाले आहेत, तुम्ही तातडीने परळी बसस्थानक रोडने अरुणोदय मार्केट लाईनला या, असे सांगितले.

माहिती मिळताच ओमकेश आणि त्याचा भाऊ मंगेश यांनी घटनास्थळी धाव घेतली. धरणीकर रोडवरील मोकळ्या जागेत लाईटच्या उजेडात त्यांना सचिन राठोड हा उभा असलेला दिसला आणि त्याच्या कपड्यांवर रक्ताचे डाग होते. त्याला विचारणा केली असता, सचिन राठोड, सुमीत पवार आणि कारभारी आंधळे हे तिघे एकत्र दारू पीत बसले होते. त्याच वेळी पैशाच्या देवाणघेवाणीवरून त्यांच्यात जोरदार वाद झाला. या वादाचे पर्यावसन हाणामारीत झाले. सचिन राठोड याने कारभारी आंधळे यांना पकडून ठेवले, तर सुमीत पवार याने आपल्या जवळील चाकूने कारभारी यांच्या गळ्यावर आणि डाव्या हाताच्या दंडावर वार केले.

रक्ताच्या थारोळ्यात पडलेल्या कारभारी आंधळे यांना त्यांच्या मुलांनी तात्काळ पोलिसांच्या मदतीने रुग्णवाहिकेतून पुढील उपचारासाठी SRTR सरकारी रुग्णालय, अंबाजोगाई येथे हलवले. मात्र, तेथे पोहोचण्यापूर्वीच वाटेतच त्यांचा मृत्यू झाला होता या प्रकरणी मृत कारभारी आंधळे यांचे पुत्र ओमकेश कारभारी आंधळे (वय २१, रा. नंदागोळ) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून परळी शहर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला आहे. आरोपी १. सचिन सोमनाथ राठोड (रा. परळी शहर) २. सुमीत पवार (रा. वसंतनगर तांडा, परळी ग्रामीण) भारतीय न्याय संहिता (BNS), २०२३ च्या कलम १०३(१) (खून) आणि ३(५) अंतर्गत गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदरील घटनेचा तपास सहाय्यक पोलीस अधीक्षक ऋषिकेश शिंदे तसेच पोलीस निरीक्षक परळी शहरचे पोलिस निरीक्षक आर. के. नाचन यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक नितीन गट्टूवार, हे करीत आहेत या घटनेतील मुख्य फरार आरोपी सुमित पवार यास पोलीस हेड कॉन्स्टेबल गोविंद एलमाटे आणि पोलीस हेड कॉन्स्टेबल रुपेश शिंदे यांनी सायंकाळच्या सुमारास त्यास शोध घेत त्यास ताब्यात घेतले.

परळी शहरात भरवस्तीत घडलेल्या या थरारक घटनेमुळे परिसरात नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले असून पोलीस पुढील तपास करत आहेत.








### फरार आरोपीला केली शिताफीने अटक:

**सहाय्यक पोलीस अधीक्षक ऋषिकेश शिंदे तसेच परळी शहरचे पोलीस निरीक्षक आर. के. नाचन यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक नितीन गट्टूवार पुढील कारवाई करीत आहेत.**

**या घटनेतील मुख्य फरार आरोपी सुमित पवार याचा शोध घेतला असता, पोलीस हेड कॉन्स्टेबल गोविंद एलमाटे आणि पोलीस हेड कॉन्स्टेबल रुपेश शिंदे यांनी सायंकाळच्या सुमारास त्यास यशस्वीरीत्या ताब्यात घेतले आहे.**

# पिंपळनेरमध्ये बालमनावर रुजताहेत रामायण-महाभारताचे संस्कार; श्री संत निळोबाराय वारकरी शिक्षण संस्थेत प्रवेश घ्यावा : ह.भ.प.गणेश महाराज

**आष्टी (प्रतिनिधी)**

पिंपळनेर श्री संत निळोबाराय यांच्या पदस्पर्शाने आणि वास्तव्याने पावन झालेल्या पिंपळनेरच्या पुण्यभूमीमध्ये आता भावी पिढीच्या जडणघडणीचे एक अत्यंत स्तुत्य पाऊल उचलले जात आहे. 'श्री संत निळोबाराय वारकरी शिक्षण संस्था, पिंपळनेर' येथे दर्जेदार शालेय शिक्षणासोबतच विद्यार्थ्यांना रामायण,महाभारत आणि वारकरी संप्रदायाच्या महान परंपरेचे धडे दिले जात असून, या आगळ्यावेगळ्या आणि संस्कारक्षम शिक्षण संस्थेत नवव्या सत्रासाठी प्रवेश प्रक्रिया सुरू झाली आहे.

आजच्या आधुनिक आणि स्पर्धेच्या युगात मुलांवर योग्य ते संस्कार बिंबवणे, हे पालकांसमोरील एक मोठे आव्हान बनले आहे. या पार्श्वभूमीवर,श्री संत निळोबाराय वारकरी शिक्षण संस्थेने हाती घेतलेला हा उपक्रम दिशादर्शक ठरत आहे.येथे केवळ पुस्तकी ज्ञान न देता, विद्यार्थ्यांच्या बालमनावर आध्यात्मिक संस्कार करून त्यांच्या सर्वांगीण विकासावर विशेष भर दिला जात आहे.संस्थेची प्रमुख



वैशिष्ट्ये आध्यात्मिक व नैतिक बैठक, रामायण,महाभारत आणि संत साहित्याच्या माध्यमातून विद्यार्थ्यांवर उच्च नैतिक आणि पारमार्थिक मूल्यांचे संस्कार, पारंपारिक आणि सांस्कृतिक मूल्यांची जपणूक करतानाच आजच्या काळाची गरज असणारे चांगल्या प्रतीचे शैक्षणिक ज्ञान,संगीताचे उच्च शिक्षण

संगीत आणि भजनाची आवड असणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी अत्यंत मोलाची सुविधा. अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालयाच्या (गांधर्व मंडळ) प्रतिष्ठित 'विशारद' पदवीपर्यंतचे शास्त्रशुद्ध संगीत शिक्षण येथे दिले जाते.वारकरी संप्रदायाचा महान वारसा जोपासतानाच विद्यार्थ्यांना आधुनिक जगातही खंबीरपणे आणि संस्कारक्षम नागरिक म्हणून उभे राहता यावे, हा या संस्थेचा मुख्य उद्देश आहे. पारमार्थिक ज्ञानासोबतच सांगीतिक गती लाभलेले हे विद्यार्थी उद्याच्या समाजाचे महत्त्वाचे आधारस्तंभ बनतील, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

### आजच आपला प्रवेश निश्चित करा!

आपल्या पाल्याच्या उज्ज्वल, संस्कारक्षम आणि यशस्वी भविष्यासाठी पालकांनी आजच श्री संत निळोबाराय वारकरी शिक्षण संस्थेशी संपर्क साधून आपला प्रवेश निश्चित करावा, असे आवाहन संस्थेच्या वतीने करण्यात आले आहे.

# महाराष्ट्राचे अपर मुख्य सचिव श्री विकास खारगे मिशन आयएएसमध्ये

महाराष्ट्र राज्याचे अपर मुख्य सचिव व सुप्रसिद्ध आयएएस अधिकारी श्री विकास खारगे हे शुक्रवार दि. 22 मे रोजी सकाळी 10 वाजता अमरावती येथे येत आहेत. अमरावतीच्या सुप्रसिद्ध अशा डॉ. पंजाबराव देशमुख आयएस अकादमीने आयोजित केलेल्या राज्यस्तरीय स्पर्धा परीक्षा संस्कार शिबिराला प्रमुख पाहुणे म्हणून ते उपस्थित राहून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणार आहेत. अपर मुख्य सचिव झाल्यानंतर श्री विकास खारगे हे प्रथमच अमरावतीला येत असून त्यांच्या स्वागतासाठी डॉ. पंजाबराव देशमुख आयएएस अकादमी सज्ज झाली आहे. हे राष्ट्रीय स्पर्धा परीक्षा शिबिर अमरावती परतवाडा रोडवरील वलगाव येथील सिकची रिसॉर्ट मध्ये श्री प्रेमकिशोर सिकची चॅरिटेबल ट्रस्ट व त्रिवेणी फाउंडेशन यांच्या सहकार्याने आयोजित करण्यात आले आहे. या शिबिराला स्पर्धा परीक्षेची तयारी करणारे 125 विद्यार्थी संपूर्ण महाराष्ट्रातून आलेले आहेत.



दिनांक 16 मे पासून सुरू झालेल्या या शिबिरामध्ये सुप्रसिद्ध आयएएस अधिकारी व राज्य माहिती आयुक्त श्री रवींद्र ठाकरे सुप्रसिद्ध आय ए एस अधिकारी व न्याय हक्क आयोगाचे आयुक्त श्री अरुण कुमार डोंगरे पोलीस अधीक्षक श्री बापू बांगर गटविकास अधिकारी व आयएएस टॉपर श्री अभिषेक कासोदे उपजिल्हाधिकारी सोनल सूर्यवंशी मुंबईचे सुप्रसिद्ध वक्ते श्री राजेश चव्हाण पुण्याच्या डीएनए प्रतिष्ठानचे स्पर्धा परीक्षा तज्ञ श्री अमोल मुळे. आलिया अहुलवालिया जळगावचे श्री एजाज शेख सुप्रसिद्ध संशोधक व अबुधाबी येथील रहिवासी प्रा.डॉ. चंद्रशेखर मुरादे सुप्रसिद्ध वैज्ञानिक प्राचार्य व्ही.टी. इंगोले रिलायन्स उद्योग समूहाचे समन्वयक श्री देवेंद्र खडसे आठ वेळा वर्ल्ड रेकॉर्ड करणारे गायक श्री विराग वानखडे सुप्रसिद्ध खगोलशास्त्रज्ञ प्रा. प्रवीण विधळे प्रसिद्ध साहित्यिक प्रा. डॉ. शोभा रोकडे यांनी या शिबिरात येऊन विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले आहे.

शिबिराचा समारोप शुक्रवार दिनांक 22 मे रोजी सकाळी 10 वाजता आयोजित करण्यात आला असून याप्रसंगी श्री विकास खारगे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणार आहेत व हे शिबिर यशस्वी करण्यासाठी त्यांनी हातभार लावला त्यांचा सन्मानही ते करणार आहेत. या कार्यक्रमाला नागरिकांनी व स्पर्धा परीक्षेला बसणाऱ्या विद्यार्थ्यांनी उपस्थित राहावे अशी विनंती मिशन आयएएसचे संचालक प्रा.डॉ. नरेशचंद्र काठोळे व पल्लवी काठोळे व सिकची चॅरिटेबल ट्रस्ट तर्फे श्री सचिन माळकर यांनी केली आहे.

# परळीत मराठा भवनाच्या जागेवर प्रत्यक्ष कामास सुरुवात

## परळीत मराठा भवनाच्या जागेवर घेतला बोरवेल; आरोप आणि प्रत्यारोपांच्या पार्श्वभूमीवर प्रत्यक्ष कामाला सुरुवात!







**परळी वैजनाथ (प्रतिनिधी)**

परळी वैजनाथ शहरात बहुप्रतीक्षित 'मराठा भवन' उभारणीच्या हालचालींना आता वेग आला आहे. मराठा भवनासाठी मंजूर झालेल्या २८ गुंठे जागेवर गुरुवारी (दिनांक २१ मे) बोरवेल घेण्यात आला असून, त्याचे उद्घाटनही पार पडले. या जागेवरून सध्या राजकीय आणि कायदेशीर आरोप-प्रत्यारोप सुरू असतानाच, प्रत्यक्ष कामाला सुरुवात झाल्याने शहरात या घडामोडीची मोठी चर्चा आहे.

### अनेक वर्षांची मागणी, मुंडेंच्या हस्ते झाले होते हस्तांतरण

परळी शहरात भव्य मराठा भवन उभे राहावे, अशी सकल मराठा समाजाची गेल्या अनेक वर्षांपासूनची तीव्र मागणी होती. या मागणीची गांभीर्याने दखल घेत, राज्याचे मंत्री व आमदार धनंजय मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली परळी वैजनाथ नगरपरिषदेच्या वतीने २८ गुंठे जागा मराठा भवनासाठी मंजूर करण्यात आली. नुकतेच स्वराज्यरक्षक धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज जयंतीचे औचित्य साधून आ. धनंजय मुंडे यांच्या हस्ते नामफलकाचे अनावरण करत ही जागा मराठा भवनासाठी देण्यात आली.

मात्र या जागेवरून नवा वाद उफाळून आला होता. "सदर जागा ही दत्त मंदिर देवस्थानची असून ती अशा प्रकारे देता येत नाही. ही जागा 'वर्ग-२' ची असल्याने नगरपरिषदेने दिलेली जागा म्हणजे मराठा समाजाची सरासर फसवणूक आहे," असा गंभीर आरोप ॲड. अर्जुन सोळंके यांनी पत्रकार परिषद घेऊन केला होता. या परिषदेत त्यांनी प्रशासकीय आणि राजकीय निर्णयांवर अनेक प्रश्नचिन्ह उपस्थित केले होते.

जागेवरून कायदेशीर व राजकीय आरोप-प्रत्यारोप सुरू असले, तरी मराठा समाज भवन उभारणीच्या निर्णयावर ठाम असल्याचे दिसून आले. २१ मे रोजी या २८ गुंठे जागेमध्ये बोरवेल घेण्याचे काम पूर्ण करून त्याचे उद्घाटन करण्यात आले.

या प्रसंगी परळीचे माजी नगराध्यक्ष बाजीरावभैय्या धर्माधिकारी यांच्यासह मराठा समाजातील अनेक प्रमुख पदाधिकारी, कार्यकर्ते आणि समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. बोरवेलच्या उद्घाटनामुळे आता प्रत्यक्ष कामाला गती मिळाल्याचे बोलले जात आहे.